# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 13 January 2026

# Time 01.00 to 01.05 PM

# Language Marathi

# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

# प्रादेशिक बातम्या

# दिनांक १३ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

राज्यात महानगरपालिका निवडणूकीचा प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. आज संध्याकाळी साडे पाच वाजता प्रचार संपणार आहे. त्यानंतर १५ जानेवारीला मतदान होईल. मतदान प्रक्रिया शांततेत, पारदर्शकपणे आणि निष्पक्ष होण्यासाठी उद्या आणि परवा पालिकेची भरारी पथके तसंच पोलीस प्रशासनातर्फे कडक बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

**

भाजपचे वरिष्ठ नेते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारासाठी आज मध्य नागपूरमधल्या भारत माता चौक, महाल, गांधी पुतळा या भागातून रोड शो काढला.

**

महाराष्ट्रातल्या महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर येत्या पंधरा तारखेला देशातले शेअर बाजार बंद राहणार आहेत. NSE आणि BSE दोन्हीने याबाबत अधिकृत घोषणा करत कॅपिटल मार्केट सेगमेंटमध्ये पूर्ण ट्रेडिंग हॉलिडे जाहीर केला आहे. राज्य सरकारनं २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी सार्वजनिक सुट्टी घोषित केल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे.

**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका क्षेत्रातल्या आस्थापनांनी आपल्याकडील कामगार, अधिकारी, कर्मचार्‍यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी द्यावी, असं आवाहन कामगार उपायुक्त नितीन पाटणकर यांनी केलं आहे. याबाबत उद्भवणाऱ्या तक्रारीचं निराकरण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर कामगार उप आयुक्त यांच्या कार्यालयामध्ये दक्षता कक्ष स्थापन करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिली गेलेली निवडणूक कर्तव्यं पार पाडण्यात कुचराई केल्याबद्दल प्रशासनानं सहा हजार आठशे एक्काहत्तर अधिकारी आणि कर्मचा-यांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत. अनिवार्य असलेल्या निवडणूक कर्तव्यांबाबतच्या किंवा प्रशिक्षणाबाबतच्या सूचनांकडे या कर्मचा-यांनी वारंवार जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्यामुळे प्रशासनानं हे कठोर पाऊल उचललं आहे.

****

राज्यातल्या आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२ जिल्हा परिषदा आणि सव्वाशे पंचायत समित्यांचा निवडणूक कार्यक्रम आज जाहिर होण्याची शक्यता आहे. यासंदर्भात आज दुपारी चार वाजता राज्य निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद बोलावली आहे.

****

सूर्याचं उत्तरायण आणि शेतात कापणीला आलेल्या पिकांच्या आनंदाप्रीत्यर्थ देशात सर्वत्र आज उत्सव साजरा केला जात आहे. महाराष्ट्रात आज भोगीचा उत्साह आहे; तर उद्या संक्रांतीचा सण साजरा होणार आहे. पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातही आज शेकोटी पेटवून, गाणी गात, पारंपारिक पदार्थांचा आस्वाद घेत लोहरीचा सण साजरा केला जातो. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्व देशवासियांना लोहरी, मकर संक्रांत, बिहू आणि पोंगलच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण देशाच्या समृद्ध कृषी परंपरांचे प्रतीक आहेत आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना प्रतिबिंबित करतात, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नामविस्तार दिन उद्या साजरा होत आहे. यानिमित्त विद्यापीठ गेट परिसरात होणाऱ्या गर्दीच्या अनुषंगानं मिलींद चौक ते मकाई गेट हा मार्ग उद्या सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात येणार असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

****

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या राहुरी इथलं महात्मा फुले कृषी विद्यापीठ आणि पुण्याची आय सी आय सी आय फाउंडेशन फॉर इन्क्लुसिव्ह ग्रोथ ही संस्था, यांच्यात नुकताच एक महत्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. यातून प्राप्त होणाऱ्या निधीचा उपयोग विद्यापीठातल्या आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी होणार असून, या निधीतून शेतकऱ्यांनाही लाभ मिळवून देणार असल्याची माहिती या विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर विलास खर्चे यांनी दिली आहे.

****

शीख धर्माचे नववे गुरू तेगबहादुर यांच्या साडे तीनशेव्या हौतात्म्य वर्षानिमित्त नांदेड इथं येत्या २४ आणि २५ जानेवारीला विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात समाज बांधवांच्या सहभागाच्या अनुषंगाने काल बीड तसंच लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात एक बैठक घेण्यात आली. यानिमित्ताने जिल्ह्यात शाळां महाविद्यालयांमध्ये रांगोळी, निबंध, चित्रकला, तसंच हस्तकला स्पर्धेचं आयोजन करण्यात येत असून, या कार्यक्रमाच्या प्रचारासाठी प्रचार रथही जिल्ह्यात फिरवण्याचं नियोजनही करण्यात येत असल्याचं या बैठकीत सांगण्यात आलं.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात गंगापूर इथं येत्या १६ तारखेला हिंदू संमेलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. या पार्श्वभूमीवर काल ध्वजारोहण करून वाहनफेरी काढण्यात आली. जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या मैदानावर हे संमेलन होणार आहे.

****

इंडिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेला आज नवी दिल्लीतल्या इंदिरा गांधी स्टेडियममध्ये सुरुवात होत आहे. दोन वेळा ऑलिंपिक पदक विजेती पी व्ही सिंधू या स्पर्धेत भारताचं नेतृत्व करेल, तर महिला एकेरीत मालविका बनसोड आणि तन्वी शर्मा भारताचं प्रतिनिधित्व करणार आहे.

****